# बृहन्मुंबई महानगरपालिका

**सहा.आयुक्त 'ए' विभाग यांचे कार्यालय, १३४-ई, श.भ.सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०००१**

क्र.सहा.आ/ए/ / ओडी /परिरक्षण, दिनांक: / /२०२६

**विषय**: गणेशोत्सव – २०२६ च्या अनुषंगाने गणेशमूर्ती आगमन, विसर्जन मार्गावरील गतीरोधक तात्पुरत्या स्वरुपात निष्कासित करुन पुर्नस्थापिक करणे तसेच मरिन ड्राईव्ह, नेताजी सुभाषचंद्र मार्गावरील रस्ता दुभाजक लोखंडी रेलिंग, खांब दुरुस्ती करणेबाबत.

**संदर्भ**: १) प्रभारी पोलीस निरिक्षक, कुलाबा वाहतूक विभाग यांचे दिनांक २७.०८.२०२६ रोजीचे क्र.७४०/वा./कु./२०२६ अन्वये प्राप्त पत्र.
२) दिनांक २७.०८.२०२६ रोजीची सहा. आयुक्त 'ए' विभाग यांच्या दालनात गणेशोत्सव – २०२६ च्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने पार पडलेली संयुक्त आढावा बैठक.
३) पोलीस उप आयुक्त (वाहतूक) दक्षिण यांजकडून वॉट्सअपद्वारे प्राप्त विनंती.

उपरोक्त संदर्भित विषयास अनुसरुन येथे असे नमूद करण्यात येते की, गणेशोत्सव – २०२६ च्या पूर्वतयारीस अनुसरुन प्रभारी पोलीस निरिक्षक, कुलाबा वाहतूक विभाग यांनी 'ए' विभाग हद्दीतील गणेशोत्सव दरम्यान आगमन, विसर्जन मार्गावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये या करीता १० महत्वाच्या रस्त्यांवरील गतीरोधक तात्पुरत्या कालावधी करीता काढून टाकण्याची व गणेशोत्सव सण समाप्ती पश्चात पुनश्च: गतीरोधक उभारणी करण्याचे नमूद केलेले आहे.

सदर प्राप्त पत्राच्या अनुषंगाने सहाय्यक आयुक्त 'ए' विभाग यांजमार्फत पोलीस प्रशासन, अग्निशमन दल, महानगरपालिकेतील संबंधित खात्यांचे प्रमुख अधिकारी तसेच स्थानिक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ समितीचे पदाधिकारी यांजसोबत दिनांक २७.०८.२०२६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकी दरम्यान उपस्थित स्थानिक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ समितीचे पदाधिकारी यांच्या विनंतीनुसार स्थानिक पोलीस व वाहतूक पोलीस यांनी सार्वजनिक गणेशमूर्ती आगमनाची सुरुवात होणे पूर्वी आगमनाच्या महत्वाच्या मार्गाची आवश्यकती दुरुस्ती करुन रस्ते समतल करण्याची तसेच सद्यस्थितीतील, गतीरोधक तात्पुरत्या स्वरुपात काढण्याची तसेच रस्त्यावरील झाडाच्या फांद्या व लटकणा-या उपयोगिता वाहिन्या (Utility Wires) काढण्याची विनंती केली.

तसेच, पोलीस उप आयुक्त (वाहतूक), दक्षिण यांनी मरिन ड्राईव्ह, नेताजी सुभाषचंद्र मार्गावरील लोखंडी रस्ता दुभाजक ना-दुरुस्त झाल्याने पादचारी रस्ता ओलांडण्याकरीता वापर करीत असल्याने सदर ठिकाणचे रस्ता दुभाजक लोखंडी रेलिंग, खांब सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने दुरुस्ती करण्याची विनंती या कार्यालयास प्राप्त झालेली आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये प्रभारी पोलीस निरिक्षक, कुलाबा वाहतूक विभाग यांजकडून प्राप्त पत्र, पोलीस उप आयुक्त (वाहतूक) दक्षिण यांचेकडून प्राप्त विनंती व सहाय्यक आयुक्त 'ए' विभाग यांचे दालनात

दिनांक २७.०८.२०२६ रोजी पार पडलेल्या संयुक्तीक बैठकीच्या अनुषंगाने 'ए' विभागातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाद्वारे गणेशमूर्ती आगमनाकरीता मुख्यत्वे वापरली जाणा-या रस्त्यांवरील गतीरोधक निष्कासित करणे, हे काम गणेशोत्सव – २०२६ सुरु होणेस कमी कालावधी शिल्लक असल्याने, तसेच सार्वजनिक गणेशमूर्ती आगमनाची सुरुवात होणार असल्याकारणाने 'ए' विभाग हद्दीतील गणेशोत्सव दरम्यान आगमन, विसर्जन मार्गावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये या करीता प्रभारी पोलीस निरिक्षक, कुलाबा वाहतूक विभाग यांनी संदर्भ क्र. १ मधील पत्रात नमूद १० महत्वाच्या रस्त्यांवरील गतीरोधक तात्पुरत्या स्वरुपात निष्कासित करणे हे, काम तात्काळ स्वरुपात पूर्ण करणे आवश्यक असल्याकारणाने विशेष बाब म्हणून २४ तासांच्या अल्प कालावधीची मोहोरबंद स्थळदरपत्रिका प्रक्रिया राबवुन करण्याचे प्रस्ताविण्यात येत आहे.

सदर काम हे अतितात्काळ व युध्दपातळीवर करावयाचे असल्याने व कामाची निकड लक्षात घेता, या कार्यालयामार्फत खालील तक्ता 'अ' मध्ये नमुद कामे तातडीने करणे आवश्यक आहे. सदर कामे महाटेंडर निविदा प्रक्रिया द्वारे राबविणे करीता पुरेसा कालावधी उपलब्ध नसल्याने, 'विशेष बाब' म्हणून महानगरपालिकेच्या नोंदणीकृत कंत्राटदारांकडून स्थळदरपत्रिका (Spot Quotation) सूचना बृहन्मुंबई महानगरपालिका संकेतस्थळावर २४ तासांकरीता प्रसिध्द करुन संबंधित कामांचा पुर्वानुभव असलेल्या कंत्राटदारांकडून मोहोरबंद स्थळदरपत्रिका मागवुन लघुत्तम निविदाकारास काम देणेकरीता प्रस्ताविण्यात येत आहे.

येथे असे ही नमूद करण्यात येते की, सन २०२५ मध्ये महाराष्ट्र शासनामार्फत गणेशोत्सव "राज्य महोत्सव" म्हणुन दर्जा देण्यात आलेला असल्याने गणेशोत्सव – २०२६ दरम्यान गणेशमूर्ती आगमन / विसर्जन वेळी कोणत्याही प्रकारची गैरसोय स्थानिक सार्वजनिक गणेशत्सव मंडळांना होऊ नये या करीता, खालील तक्ता 'अ' मध्ये नमूद गतीरोधक निष्कासनाची कामे तात्काळ पूर्ण करणे आवश्यक आहे. सबब, प्रस्तावित कामांचे स्थळ निहाय यादी तयार करुन अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. (प्रती पृष्ठ क्र. सी- …….. ते सी- ……..)

प्रस्तावित कामांस होणा-या अंदाजित खर्चाची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे आहे:

**'तक्ता – अ'**

| अनु. क्र. | कामाचे ठिकाण व स्वरुप | अंदाजित रक्कम (कर विरहित) |
|---|---|---|
| १ | 'ए' विभागातील जी.डी. सोमाणी मार्गावरील गतीरोधक गणेशोत्सव दरम्यान तात्पुरत्या स्वरुपात निष्कासित करुन पुर्नस्थापित करणे. | २३६४८५.५० |
| २ | 'ए' विभागातील मेकर टॉवर इमारती जवळील, जी.डी. सोमाणी मार्गावरील गतीरोधक गणेशोत्सव दरम्यान तात्पुरत्या स्वरुपात निष्कासित करुन पुर्नस्थापित करणे. | १७२४२५.०० |
| ३ | 'ए' विभागातील शहीद भगत सिंग मार्गावरील गतीरोधक गणेशोत्सव दरम्यान तात्पुरत्या स्वरुपात निष्कासित करुन पुर्नस्थापित करणे. | २३७२२०.०० |
| ४ | 'ए' विभागातील कॅप्टन प्रकाश पेठे मार्गावरील गतीरोधक गणेशोत्सव | २३९२२९.३० |

| | | |
|---|---|---|
| | दरम्यान तात्पुरत्या स्वरुपात निष्कासित करुन पुर्नस्थापित करणे. | |
| ५ | 'ए' विभागातील जनरल जगन्नाथ भोसले मार्गावरील गतीरोधक गणेशोत्सव दरम्यान तात्पुरत्या स्वरुपात निष्कासित करुन पुर्नस्थापित करणे. | २३८९३४.०० |
| ६ | 'ए' विभागातील नाथालाल पारेख मार्गावरील गतीरोधक गणेशोत्सव दरम्यान तात्पुरत्या स्वरुपात निष्कासित करुन पुर्नस्थापित करणे. | २३५५५६.०८ |
| ७ | 'ए' विभागातील साधु टी.एल. वासवानी मार्गावरील गतीरोधक गणेशोत्सव दरम्यान तात्पुरत्या स्वरुपात निष्कासित करुन पुर्नस्थापित करणे. | २३४३४१.३० |
| ८ | 'ए' विभागातील ससुन डॉक परिसरातील रस्त्यावरील गतीरोधक गणेशोत्सव दरम्यान तात्पुरत्या स्वरुपात निष्कासित करुन पुर्नस्थापित करणे. | २३७५८४.०० |
| ९ | 'ए' विभागातील आय.एन.एस. शिक्रा परिसरातील शहीद भगत सिंग मार्गावरील गतीरोधक गणेशोत्सव दरम्यान तात्पुरत्या स्वरुपात निष्कासित करुन पुर्नस्थापित करणे. | २३८४३०.५० |
| १० | 'ए' विभागातील मिंट रोडवरील गतीरोधक गणेशोत्सव दरम्यान तात्पुरत्या स्वरुपात निष्कासित करुन पुर्नस्थापित करणे. | २२२६९१.०० |
| ११ | 'ए' विभागातील महर्षी कर्वे रोड व डॉ. डी.एन. रोडवरील गतीरोधक गणेशोत्सव दरम्यान तात्पुरत्या स्वरुपात निष्कासित करुन पुर्नस्थापित करणे. | २३८१९७.०० |
| १२ | 'ए' विभागातील मारुती लेन व ए.के. नायक मार्गावरील गतीरोधक गणेशोत्सव दरम्यान तात्पुरत्या स्वरुपात निष्कासित करुन पुर्नस्थापित करणे. | २३६९९३.०० |
| १३ | 'ए' विभागातील नेताजी सुभाषचंद्र मार्ग रस्त्यावरीळ बोलार्ड खांब दुरुस्ती करणे. | २७००००.०० |
| १४ | 'ए' विभागातील नेताजी सुभाषचंदर मार्ग, एअर इंडिया बिल्डींग समोरील लोखंडी बोलार्ड खांबे ग्रील लावुन दुरुस्ती करणे. | २६००००.०० |
| | **एकूण** | **३२,९८,०८६.६८** |

सदर कामासाठी येणारा खर्च सन २०२६ - २०२७ च्या खालील अर्थसंकल्पीय सेवाशिर्षातून भागविण्याचे प्रस्ताविण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| निधी संकेतांक | - ११ |
| व्यय केंद्र संकेतांक | - ४०१०३५०००० |
| कार्य संकेतांक | - ००२१४००००० |
| लेखा संकेतांक | - २३०८०३५०९ (Ganpati Immersion) |

उपरोक्त बाबींचा विचार करता, उपरोक्त तक्ता 'अ' मध्ये नमूद कामे स्थळदरपत्रिका (Spot Quotation) सूचना बृहन्मुंबई महानगरपालिका संकेतस्थळावर २४ तासांकरीता प्रसिध्द करुन, प्राप्त मोहोरबंद स्थळदरपत्रिकेतून लघुत्तम दर देकाराकडून पार पाडण्याकरीता कार्यकारी अभियंता 'ए' विभाग /

सहाय्यक आयुक्त 'ए' विभाग यांची शिफारस व मा.उप आयुक्त (परिमंडळ – १) यांची खालील नमूद बाबींकरीता प्रशासकीय मंजूरी मिळावी, ही विनंती.

१. गणेशोत्सव – २०२६ च्या अनुषंगाने, उपरोक्त तक्ता 'अ' मध्ये नमूद गणेशमूर्ती आगमन, विसर्जन मार्गावरील गतीरोधक तात्पुरत्या कालावधीसाठी गणेशमूर्ती आगमनापूर्वी निष्कासित करुन गणेशमूर्ती विसर्जना नंतर पुर्नप्रस्थापित करणे,
२. नमुद लेखासंकेतांक २३०८०३५०९ (Ganpati Immersion) मध्ये उपलब्ध निधीतून प्रस्तावित कामांचे अधिदान प्रस्ताविणेस,
३. उपरोक्त व्यवस्था करणेसाठी 'विशेष बाब' अंतर्गत महानगरपालिका संकेतस्थळावर २४ तासांच्या कालावधी करीता (दिनांक ०८.०९.२०२६ – सकाळी ११:०० ते दिनांक ०९.०९.२०२६ – सकाळी ११:०० पर्यंत) कामेनिहाय मोहोरबंद स्थळदरपत्रिका (Sealed Spot Quotation) मागविणे व दिनांक ०९.०९.२०२६ रोजी दुपारी ०३:०० वाजता संबंधित अधिकारी/कर्मचारी/कंत्राटदार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडणेस,
४. प्राप्त झालेल्या दरपत्रिकांमधुन लघुत्तम दरपत्रिकाकारास लेखी, सॅप कार्यादेश देऊन त्वरीत काम प्रदान करण्यास,
५. प्रस्तावित कामे ही तात्काळ स्वरूपाची असून पुरेसा कालावधी उपलब्ध नसल्याने बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम (सुधारीत) कलम ७२ (३) अन्वये उपरोक्त स्तंभ 'अ' मध्ये दर्शविलेल्या कामाचे एकुण मुल्य रु.३.०० लक्ष पेक्षा जास्त होत असले तरी प्रस्तुत प्रकरणी सार्वजनिक निविदा मागविण्याची अट शिथील करण्यासाठी.

सदर प्रस्ताव लेखा अधिकारी 'ए' विभाग यांजकडे छाननी व पडताळणी करणेकरीता व पुढील योग्य त्या मंजूरीसाठी अग्रेषित करण्यात येत आहे.

मंजूरी करीता सविनय सादर.

Sd/-

सहाय्यक अभियंता (परिरक्षण) 'ए' विभाग

<u>कार्यकारी अभियंता 'ए' विभाग</u>

<u>मा. सहाय्यक आयुक्त 'ए' विभाग</u>

महोदय,

<u>लेखा अधिकारी 'ए' विभाग</u>

<u>मा. उप आयुक्त (परि-१)</u>

महोदया,